शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष चौदावे : अंक एकेचाळीसावा व बेचाळीसावा
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२५ (जोडअंक)

## भाषा आणि साहित्याभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप



कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे



नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. २३१९-६०२५

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष चौदावे : अंक एकेचाळीसावा व बेचाळीसावा

जानेवारी--फेब्रुदारी-मार्च २०२५, एप्रिल-मे-जून २०२५ (जोडअंक)

## भाषा आणि साहित्याभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक

• अतिथी संपादक •

प्रा. डॉ. अरुण शिंदे

• संपादन सहाय्य •

प्रा. डॉ. निलेश शेळके । प्रा. डॉ. बळवंत मगदूम । प्रा. डॉ. मांतेश हिरेमठ

पत्रिका संपादक मंडळ

• संपादक •

प्रा. डॉ. नंदकुमार मोरे

• सदस्य •

प्रा. डॉ. देवानंद सोनटक्के । प्रा. डॉ. जयवंत दळवी । प्रा. डॉ. सुभाष पाटील

• प्रकाशक •

. प्रा. डॉ. भरत जाधव

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

द्वारा : द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे,

ता.जि. सातारा ४१५५१९

• मुद्रक •

भारती मुद्रणालय

८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर.

फोन नं.: ०२३१-२६५४३२९

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. भरत जाधव, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे, ता.जि. सातातरा ४१५५१९ येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

१७६ कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मराठी भाषा / रोहन सुखदेव आपटे ........ ४९२
१७७ विज्ञान साहित्य : विज्ञान आणि कल्पित / प्रणाली गणेशराव धुळे ........ ४९४
१७८ कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मराठी भाषा / प्रा. डॉ. सागर अशोक पाटील ........ ४९७
१७९ बोलीभाषांचे सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ : दलित आत्मकथनांच्या परिप्रेक्ष्यातून / डॉ. शैलजा श्रीधर शिंदे ..... ५०१
१८० साहित्य आणि समाज यांचा अनुबंध / डॉ. गवराम नाना पोटे ........ ५०४
१८१ सोंगी भजन / श्री. तात्यासो महादेव माळी ........ ५०७
१८२ बोलीभाषांचे सामाजिक – सांस्कृतिक संदर्भ / भाग्यश्री सुभाष कवितके ........ ५१०
१८३ साहित्य आणि चित्रपट : सहसंबंध / प्रा. डॉ. प्रवीण ताटे देशमुख ........ ५१३
१८४ व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथा साहित्यातील समाजशास्त्रीय दृष्टिकोन / डॉ. चंद्रशेखर मधुकर भारती ........ ५१६
१८५ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि भाषा शिक्षकांचा आंतरविद्याशाखीय अभ्यास / प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर ...... ५१९
१८६ भाषांतर आणि आंतरसांस्कृतिक संवाद / कु. ऋणाली रोहिदास नांद्रेकर ........ ५२२
१८७ आधुनिक मराठी नाटकातील मिथक / प्रा. स्मिता कोंडिबा कालभूषण ........ ५२५
१८८ 'बलुतं' व्यक्तिमनाबरोबरच समूहमनाचा जिवंत व ज्वलंत अनुभवाविष्कार / डॉ. नवनाथ गुंड ........ ५२८
१८९ संत तुकारामांच्या अभंगातून प्रतित होणरा प्रबोधनविचार / प्रा.डॉ.हिराचंद्र रोहिदास मोरे ........ ५३०
१९० मराठी साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास / प्रा.सौ.सविता प्रशांत रोटे ........ ५३३
१९१ वाङ्मयीन चळवळ : स्वरूप व विशेष / प्रा.साजिदा सरदार आरवाडे ........ ५३५
१९२ नामदेव ढसाळांच्या काव्यातील विद्रोह / प्रा. डॉ. अभिमन्यू गेना ओहळ ........ ५३८
१९३ कोल्हापुरी बोली आणि संस्कृती / प्रा.डॉ.एकनाथ आळवेकर ........ ५४२
१९४ साहित्य आणि समाज यांचा अनुबंध / प्रा. पांडुरंग नारायण पाटील ........ ५४४
१९५ साहित्य आणि तत्त्वज्ञान / डॉ.बाळासो आण्णा सुतार ........ ५४६
१९६ भाषा, साहित्य व इतर ज्ञानशाखांचा अनुबंध / डॉ. आशालता नारायण खोत ........ ५४९
१९७ चरित्रलेखन प्रक्रियेतील 'प्रभावक' आणि 'प्रभावित' / प्रा. शिवाजी वसंत देसाई ........ ५५२
१९८ मराठी कादंबरीतील वसाहातिक काळाचे चित्रण / डॉ. लक्ष्मण शिंदे ........ ५५४
१९९ संत एकनाथांची निवडक भारूडे आणि मराठी संस्कृती / डॉ. कु. कोकिळा हनुमंत चांगण ........ ५५७
२०० मराठी आणि कन्नड भाषेचा सहसंबंध / डॉ. सुनीता विजय जाधव ........ ५६०
२०१ संस्कृती अभ्यास / प्रा. वैशाली अर्जुन टेळे ........ ५६२
२०२ चळवळी आणि मराठी साहित्य / डॉ. राजाराम सोनटक्के ........ ५६४
२०३ वडार लोककथांचे वडार बोलीतील दस्तावेजीकरण / डॉ. विजयालक्ष्मी वि. देवगोजी ........ ५६६
२०४ मराठी दलित कवितेतील भाषा / दिपाली जगजेराव कसबे, मार्गदर्शक : प्रा. डॉ. वामन मुरलीधर जाधव ...... ५६८
२०५ भाषा आणि लिंगभाव / निकिता अनिल शेंडगे ........ ५७०
२०६ कोडी/हुमाणमधील भाषा, समाज आणि संस्कृती / प्रा.डॉ.मानसी जगदाळे ........ ५७३
२०७ समाज, संस्कृती आणि भाषा / रेश्मा चंद्रकांत जाधव, मार्गदर्शक : प्रा. डॉ. तानाजी अंबादास देशमुख ........ ५७५
२०८ शशिकांत हिंगोणेकर यांच्या 'अजूनही' या काव्यसंग्रहातील परिवर्तनाची भाषा... /
प्रा. डॉ.माधव कौतिक कदम ........ ५७७
२०९ समाज, संस्कृती आणि भाषा / प्रमिला गणेश तरंगे ........ ५८०
२१० साहित्य, समाज आणि संस्कृती : सहसंबंध / प्रा. विनायक विलास सरदेसाई ........ ५८२
२११ मराठी भाषेचे अर्थशास्त्र : बदलती प्रवृत्ती आणि भविष्यातील संधी / डॉ. शीतल सचिन गोर्डे-पाटील ........ ५८४

# कोल्हापुरी बोली आणि संस्कृती

**प्रा.डॉ.एकनाथ आळवेकर**

**प्रमुख, मराठी विभाग, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर**

भाषेचा अभ्यास करताना प्रमाणभाषा आणि बोलीभाषा दोन्ही अंगाने अभ्यास करता येतो. भाषेचा उगम कधी झाला? त्या भाषेवर आजपर्यंत कोणत्या इतर भाषांचा प्रभाव पडलेला आहे? त्या भाषेच्या कोणकोणत्या बोली आहेत? त्या भाषेची सद्यस्थिती कशी आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे भाषाभ्यातून मिळत असतात. भाषा ही व्यवहारासाठी अस्तित्वात आलेली व्यवस्था आहे. मराठी भाषेचा विचार करता सुमारे अकरा कोटी लोकांची भाषा मराठी आहे. मात्र ही मराठी सर्वच ठिकाणी एकसारखी बोलली जात नाही. प्रदेशानुसार मराठी भाषेचे स्वरूप वेगवेगळे दिसते. बारा कोसाला भाषा बदलते असे म्हटले जाते. पण बारा कोसाला भाषा बदलत नसून त्या भाषेची वैशिष्ट्ये बदलतात. केवळ मराठी भाषेचा विचार केला तर बारा कोसावर मराठी बोली बदललेली दिसते.

मराठीच्या ज्या अनेक बोली आहेत त्यापैकी कोल्हापुरी ही एक बोली आहे. 'कोल्हापुरी बोली' हे नाव कोल्हापूर जिल्ह्याच्या नावावरून पडले आहे. कोल्हापूर शहर आणि जिल्ह्यातील करवीर, कागल, भुदरगड, राधानगरी, शिरोळ, शाहूवाडी हे तालुके तसेच चांदोली परिसर आणि कर्नाटक सीमाभाग, गगनबावडा तालुक्याचा सीमाभाग या परिसरात बोलली जाणारी बोली ही 'कोल्हापुरी बोली' म्हणून ओळखली जाते. 'कोल्हापुरी बोली' वरील प्रभावाचा विचार केला तर कागल, शिरोळ परिसरातील बोलीवर कन्नड भाषेचा प्रभाव दिसतो, तर गगनबावडा, शाहूवाडी आणि चांदोली परिसरातील बोलीवर कोकणी उच्चाराचा प्रभाव आढळतो.

विशिष्ट भाषेचा एका विशिष्ट सामाजिक गटाच्या संस्कृतीशी संबंध असतो. भाषा आणि संस्कृतीचा अत्यंत जवळचा संबंध आहे. भाषा संस्कृती आहे आणि संस्कृती ही भाषा आहे. भाषा अस्तित्वात असल्यापासून संस्कृती सुरू झाली. भाषेबरोबर संस्कृतीचे संवर्धन करायला हवे. विशेषतः बोलीभाषेच्या माध्यमातून त्या त्या प्रदेशाची संस्कृती कळते म्हणून प्रदेशानुसार बोली बदलते तशी संस्कृती बदलत असते.

कोल्हापुरी बोलीतून कोल्हापूर जिल्ह्यातील संस्कृतीचे प्रतिबिंब पाहायला मिळते. कोल्हापूर परिसरातील कोणीही व्यक्ती जगाच्या पाठीवर कोठेही भेटली तर त्याच्या बोलण्यातून कोल्हापूरच्या संस्कृतीचे दर्शन होते. काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द असे असतात की, ते शब्द त्या त्या बोलीची ओळख असते. कोल्हापुरी बोलीमध्ये असे अनेक शब्द, वाक्यव्यवस्था, म्हणी, वाक्यप्रचार आहेत. यातून कोल्हापूर परिसराच्या संस्कृतीची ओळख होते.

**कोल्हापुरी बोलीतील शब्द**

कोल्हापुरी बोलीमध्ये वैशिष्ट्यपूर्ण असे अनेक शब्द आढळतात. त्या शब्दांचे अर्थ स्पष्ट करताना विश्लेषण करावे लागते असे काही शब्द पुढीलप्रमाणे,

पैरेकरी – (मूळ शब्द पैरा) शेतीकामात एकमेकांना मदत करणे म्हणजे पैरा करणे. जो आपल्या शेतात कामाला येतो त्याच्या शेतात कामाला जाणे म्हणजे पैरा. जो काम करतो तो पैरेकरी.

खळं – धान्य मळण्याची जागा. धान्य मळण्याची शेणामातीने सारवलेली गोलाकार जागा म्हणजे खळं. त्या खळ्याच्या मधोमध तिवडा रोवला जातो. त्याभोवती गुरे फिरवून, आताच्या काळात ट्रॅक्टर फिरवून धान्याची मळणी केली जाते.

तिवडा – धान्य मळण्याच्या खळ्याच्या मधोमध भरीव बांबूचा अगर झाडाचा चार ते पाच फूट उंचीचा सोट रोवला जातो त्याला तिवडा म्हणतात.

किऱ्यानिष्ट – किऱ्यानिष्ट म्हणजे विचित्र, विक्षिप्त, वागणारी भांडखोर, चांगल्या कामात अडथळा आणणारी व्यक्ती असा होतो. या शब्दातून त्या व्यक्तीच्या अवगुणाकडे लक्ष दिले जाते.

किटान – गोवऱ्या, शेणी थापण्यासाठी वर्षभर साठवलेले म्हैस, गाय, बैल यांचे शेण. गोवऱ्या थापण्याच्यावेळी त्या शेणात वाळलेल्या पाल्यापाचोळ्याचा कूट, उसाच्या चिपाडाचा कूट घालून, पाणी घालून गोवऱ्या थापल्या जातात. त्या गोवऱ्या वाळवून रचून ठेवल्या जातात आणि वर्षभर चुलीसाठी इंधन म्हणून वापरल्या जातात.



ISSN No. 2319-6025

गुळभात - साखरपुडा हा या शब्दाला समानार्थी असणारा हा शब्द आहे. लग्न ठरले की ग्रामीण भागातील प्रथेप्रमाणे गुळभात करून लग्न पक्क केलं जातं. यावेळी वर पक्षाकडून वधुपक्षाला तसेच वधू पक्षाकडून वरपक्षाला जो मानपान द्यावयाचा असतो त्याचा उल्लेख असलेल्या पंचांच्या समक्ष ठरावाच्या याद्या केल्या जातात आणि गोड जेवण केले जाते. पुऱ्याकाळी अशा कार्यक्रमात गुळाचा वापर होत असल्याने त्याला गुळभात म्हटले जात होते. कोल्हापूर परिसरात गुळभात हा कार्यक्रम वधूपक्षाच्या पुढाकाराने होतो.

पावणेर - पावणेर करून शेतातील काम करून घेण्याची पद्धत कोल्हापूर परिसरातच पाहायला मिळते. एकमेकांच्या मदतीने शेतातील कोणतेही काम करून घेतल्यानंतर ज्यांचे काम असते त्याने सर्वांना जेवण द्यायचे म्हणजे पावणेर. शेतातील काम जिकिरीचे असते. कधी ते मर्यादित वेळेत पूर्ण करावे लागते. अशावेळी शेतकरी वर्ग एकमेकांच्या मदतीने ते काम पूर्ण करतात. रात्री मांसाहारी, शाकाहारी जेवणाचा बेत असतो.

**कोल्हापुरी बोलीतील वाक्यव्यवस्था**

बोलीभाषेत एखादे वाक्य तसेच त्या वाक्यातील विशिष्ट शब्द असेल तर त्या वाक्याचा अगर त्यातील एखाद्या शब्दाचा संदर्भाने अर्थ घ्यावा लागतो. कोल्हापुरी बोलीतील अशी काही वाक्ये व त्यांचे अर्थ पुढीलप्रमाणे-

'वातीत गावलाय पाऊस, रोज जरा तरी लागायचाच आता दसरा सपस्तवर' (गावठाण - कृष्णात खोत, पृष्ठ २५) पाऊस वातीत गावणे म्हणजे पाऊस वातीत सापडणे. वात म्हणजे दिव्याची वात. दसरा सणाच्यावेळी म्हणजे नवरात्रीमध्ये देवासमोर नऊ दिवस तेलाची वात लावली जाते. दसरा सणाच्या पहिल्या दिवशी थोडा जरी पाऊस पडला तरी पाऊस वातीत सापडला अशी समजूत आहे. पुढे मग दसरा सण संपेपर्यंत दररोज थोडा तरी पाऊस लागतो.

'त्या पाटा आता आणायच्या दोन-तीन येतानं अर्धलीन दिल्यल्या' (गावठाण - कृष्णात खोत, पृष्ठ १००) या वाक्यात पाटा, येतानं आणि अर्धलीन असे तीन शब्द आहेत. पाटा हे पाटचे अनेकवचन आहे. पाट म्हणजे शेळीपासून जन्मलेली मादी जातीचे पिल्लू. येतानंचा मूळ शब्द वेत. गाय, म्हैस, शेळी यांच्या विण्याचा काळ म्हणजे वेत. वेत या शब्दाचा अपभ्रंश येतानं असा झाला आहे. वरील वाक्यातील अर्धलीनं हा शब्द अत्यंत महत्त्वाचा असून पहिल्या दोन शब्दांचा संदर्भ स्पष्ट करणार आहे. अर्धलीने देणे हा शेतकरी वर्गातील दुभत्या जनावरांच्या बाबतचा एक व्यवहार आहे. गाय, म्हैस, शेळी ही जनावरे शेतकऱ्यांच्या घरातील दुभती जनावरे आहेत. ज्यांच्या घरात जास्त जनावरे असतात किंवा ज्यांना जनावरे पोसण्याची ऐपत नसते असा शेतकरी आपली दुभती जनावरे त्यांच्या पहिल्या विण्याच्या वेताच्या अगोदर दुसऱ्याला दोन-तीन वेताचे दूध खाण्याच्या तोंडी करारावर पाळायला देतो त्या व्यवहाराला अर्धलीन देणं असे म्हटले जाते.

**कोल्हापूर परिसरातील म्हणी व त्यांचा अर्थ**

उदाहरणार्थ, खाल मान्या नि गाव तान्या - इतरांच्या दृष्टीने अस्तित्वहीन असताना कर्तृत्व दाखविणे, बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर - एखाद्या गोष्टीचा पुरावा मागणे, मुंगीला मुताचा पूर - शुल्क बाबीने मोठेपणाचा आव आणणे, वड्याचे तेल वांग्यावर - एखाद्या गोष्टीचा राग दुसऱ्या गोष्टीवर काढणे, सांगकाम्या ओ नाम्या - सांगितलं तेवढंच करणारा, कोल्हापुरी बोलीतील वाक्यप्रचार - , खळीला येणे - घाई करणे, खडकासंग धडका मारणे - अशक्य गोष्ट शक्य करण्याचा प्रयत्न करणे, गळ घालणे - विनंती, गयावया करणे, झक मारणे - विनाकारण एखादी गोष्ट करणे. एखादी गोष्ट केल्याचा पश्चात्ताप होणे, डुक धरणे - सूड बुद्धीने वागणे, नटून पाणी होणे - आनंद होणे.

**समारोप**

'कोल्हापुरी बोली आणि संस्कृती' या विषयाची मांडणी करताना कोल्हापुरी बोलीतील उदाहरणादाखल दिलेले शब्द, वाक्य, म्हणी, वाक्यप्रचार यातून कोल्हापूर परिसराची वेगळी ओळख पाहायला मिळते. शेती व्यवहार, लग्नसंस्कार सणवार, विविध प्रवृत्तींची माणसं, स्त्रियांच्या, पुरुषांच्या, लहान मुलांच्या भावभावना, पोशाख, रीतिभाती अशा अनेक गोष्टी बोलीतून जाणवतात. 'बोलीभाषा आणि संस्कृती' हा अभ्यास बोली आणि संस्कृती संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण ठरतो.

**संदर्भ :**


१. जोशी वसंत (संपा)- भाषा व साहित्य संशोधन
२. भोसले द. ता. - ग्रामीण बोलीचा शब्दकोष
३. सरवदे औदुंबर - बोली विज्ञान
४. मराठी विश्वकोश, खंड ११, पृ. ९२८


◆◆◆